दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.४ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २१६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 4 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 216 | Pages 4 | Rate 4 Rs

### समृद्धी महामार्गावर मोठा पर्दाफाश

**मुंबई**–संभाजीनगरमध्ये समृद्धी महामार्गावर मध्यरात्री मोठी कारवाई करत दोन ड्झ्त्र्ग गॅस टँकर जप्त करण्यात आले आहेत. या टँकरमधील गॅस काळ्या बाजारात विकला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.काल उशिरा रात्री समृद्धी महामार्गावर तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. दोन टँकर संशयास्पद हालचाली करत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत मोठ्या प्रमाणावर LPG गॅसचा साठा आढळून आला. हा गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून विक्रीसाठी वापरला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर अधिकाऱ्यांनी तत्काळ टँकर ताब्यात घेतले.या प्रकरणाबाबत माहिती देताना विभागाचे अधिकारी चंद्रकांत डांगे यांनी सांगितले की, या टँकरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून काळ्या बाजारात विकला जात होता. एका सिलिंडरची किंमत ५ हजार ते १० हजार रुपयांपर्यंत आकारली जात असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# अवकाळीग्रस्तांना दिलासा!

## पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश–चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर । प्रतिनिधी**

मराठावाडा, विदर्भ आणि राज्यातील अनेक भागात अवकाळी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. याचे सर्वेक्षण करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचेही आदेश मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना दिले आहेत, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. सर्वेक्षण करत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाईल.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अशोक खरात प्रकरणात पोलिसांकडून सर्व बाजूने योग्य तपास सुरू आहे. पोलिसांकडे जी माहिती येते आहे त्या आधारावर पोलिस काम करत आहे. कोणाकडे अजून काही माहिती असेल त्यांनी जर ती पोलिसांना दिली तर तपासाला चालना मिळेल. या प्रकरणी संपूर्ण चौकशी पारदर्शकपणे सुरू आहे. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी कोणालाही सोडणार नाही असे सांगितले आहे.

**खरात प्रकरणी चौकशी सुरू**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, खरात प्रकरणी एसआयटी चौकशी सुरू आहे. त्यांना जे जमीनीचे गैरव्यवहार दिसून येतील त्यानंतर त्यावर आम्ही चौकशी करू. पोलिस तपास सुरू असताना दुसऱ्या चौकशा लावणे योग्य नाही.

**यापुढे कोणाला गैरफायदा घेता येणार नाही**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, लाडकी बहीण योजनेचा काही लोकांनी गैरफायदा घेतला असेल तर शासन ते शोधून काढते. नंतर मात्र त्यांना लाभ होणार नाही. काही लोकांनी योजनेचा गैरफायदा घेतला तसा घ्यायला नको होता पण यापुढे त्यांना लाभ मिळणार नाही. राष्ट्रवादी अजित पवार पक्षातील गोष्टींबद्दल मला काही माहिती नाही, असे म्हणत त्यांनी सुनेत्रा पवारांनी निवडणूक आयोगाला लिहलेल्या पत्रावर बोलणं टाळले.


**राहुल गांधींवर टीका**

राहुल गांधी यांना 'वंदे मातरम'चा नेमका अर्थही माहित नाही. त्यांनी हे राष्ट्रगीत कधी मनापासून वाचले नाही आणि समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. वस्तुस्थिती तर अशी आहे की, त्यांना 'वंदे मातरम'च्या चार ओळीही नीट म्हणता येत नाहीत, असे म्हणत चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर राष्ट्रभक्तीच्या मुद्द्यावरून तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे.



## अवकाळी पावसात बीड बस स्थानकाची पोल खोल; कोट्यवधींच्या कामात निकृष्ट दर्जा उघड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील बस स्थानकाच्या विकासकामावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही कामाचा निकृष्ट दर्जा समोर आला आहे. अवकाळी पावसाच्या पहिल्याच तडाख्यात बस स्थानकाच्या छताला गळती लागल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.अद्याप काम पूर्णत्वास गेले नसतानाच जे बांधकाम पूर्ण झाले आहे, त्याची गुणवत्ता अत्यंत खराब असल्याचे स्पष्ट होत आहे. आज झालेल्या अवकाळी पावसामुळे बस स्थानकाच्या छतामधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळत असून प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, या कामावर कोट्यवधींचा खर्च करण्यात आला असूनही एका पावसातच बांधकामाची पोलखोल झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. संबंधित काम पूर्ण होऊन वर्षही उलटलेले नसताना अशी अवस्था निर्माण झाल्याने बांधकामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित कंत्राटदारावर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्हा प्रशासन याबाबत काय भूमिका घेणार, दोषींवर कारवाई होईल की प्रकरण दाबले जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## युसुफवडगाव येथे रात्री तून महात्मा बसवेश्वरांचा अश्वारुढ पुतळा उभारला,अज्ञातांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




केज तालुक्यातील युसुफवडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालया समोर रात्रीतून अज्ञात कार्यकर्त्यांनी महात्मा बसवेश्वर यांचा अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्या प्रकरणी ग्राम पंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांच्या फिर्यादी वरून अज्ञात इसमां विरुद्ध युसूफवडगाव पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

युसुफवडगाव येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर अज्ञात लोकांनी महात्मा बसवेश्वर यांच्या पाच ते सहा फुट उंचीच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी केल्याचे निदर्शनास आले.पुतळा उभारण्यापूर्वी यालोकांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाची परवानगी न घेता हा पुतळा त्यांच्या मालकीच्या जागेत उभारल्याचे स्पष्ट झाले. गावातील सरपंच,ग्राम पंचायतचे सदस्य यांच्या कडे विचारणा केली असता त्यांनी कोणी पुतळा उभा केला,याची माहिती नसल्याचे सांगितले.तर पुतळ्याचे पावित्र्य न राखता व सुरक्षेची काळजी न घेता पुतळाउभारणी केल्याची फिर्याद सोमवार दि.३१ मार्च रोजी ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप नखाते यांनी दिल्यावरून अज्ञात व्यक्तिविरुद्ध युसूफ वडगांव पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार सीताराम डोंगरे हे पुढील तपास करीत आहेत.

## जांभीपाणीपाडा हादरले! किरकोळ वादातून तरुणाला खांबाला बांधून मारहाण; निर्घृण हत्या

### अक्कलकुवा तालुक्यातील संतापजनक प्रकार; कायद्याला धाब्यावर बसवून जमावाचा हिंसक अवतार

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**




प्रेक्षकहो! माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना अक्कलकुवा तालुक्यातील डाबचा जांभीपाणीपाडा येथे घडली आहे. केवळ घरात घुसून मारहाण केल्याच्या संशयावरून, एका ४४ वर्षीय व्यक्तीला घराच्या सिमेंटच्या खांबाला दोरीने बांधून लाकडी काठ्यांनी बेदम मारहाण करत त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्यात खळबळ उडाली असून कायद्याचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मयत महेंद्र हात्या वसावे (राहणार सोराचापडा, मोलगी) हे १ एप्रिलच्या पहाटे ३ वाजेच्या सुमारास आरोपी बामण्या पाश्या राऊत यांच्या घरात गेले होते. तिथे त्यांनी गिमलीबाई राऊत यांना मारहाण केल्याचा राग मनात धरून, आरोपींनी कायद्याला हातात घेतले. महेंद्र वसावे यांना पकडून घराच्या सिमेंटच्या खांबाला दोराने बांधण्यात आले. असहाय्य अवस्थेत असलेल्या महेंद्र यांना चारही आरोपींनी लाकडी काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी इतकी बेदम मारहाण केली की, त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी मयताची पत्नी लिलावाई वसावे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०३(१) आणि ३(५) नुसार संशयित बामण्या पाश्या राऊत,. गिमलीबाई बामण्या राऊत, दिनेश बामण्या राऊत, सुरती बामण्या राऊत. यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सध्या पोलीस या आरोपींचा कसून शोध घेत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक जयसिंग पावरा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक जयसिंग पावरा या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## जि.प.उ.प्रा.शा.कानडीमाळी येथे आनंदनगरी आनंदात संपन्न; विविध वस्तू विकत चिमुरड्यांनी घेतला आनंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कानडी माळी या ठिकाणी आनंद नगरीमध्ये बाल चिमुकल्यांनी भरभरून सहभाग घेतला. आनंद नगरीच्या उद्धाटन प्रसंगी गावातील प्रतिष्ठित पालक श्री सुदाम राऊत,श्री जालिंदर राऊत, श्री ओमप्रकाश पटणे, माता पालक वर्ग,मुख्याध्यापक श्री गिरी सर, सहशिक्षक इंगळे सर ,श्रीमती जाधव मॅडम ,चाटे मॅडम, देशमुख मॅडम ,थाटकर मॅडम, शेलार मॅडम व घाडगे मॅडम तसेच शिक्षण प्रेमी ,पालक वर्ग, माजी विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी पॅटीस, पुरी भाजी ,वडापाव ,पावभाजी ,गुलाब जामुन ,विविध फळे ,भेळ ,चिंचा , कवठ, इडली, वडे, पाणीपुरी ,असे विविध पदार्थ बनवून आणले होते. प्रत्यक्षात पैशांचा व्यवहार कसा करावा, नफा तोटा



,आकडेमोड, पैसे मोड ,चिल्लर याचे प्रात्यक्षिक ज्ञान अगदी पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांनी आनंद नगरीतून घेतले. अशा पद्धतीने आनंदगरी उत्साहात पार पडली.

## नाशिक जिल्यातील ओढा गावी भैरवनाथ महाराजाचा पालखी सोहळा संपन्न!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नाशिक जिल्यातील मुक्काम पोस्ट ओढा हे गाव पुरातन युगातील गाव असून या गावात सीतामाईनी लव अंकुश यांना जन्म दिला. याच गावातील पेशवेकालीन सरदार रंगनाथराव ओढेकर यांनी नाशिक येथील काळाराम मंदिर बांधले.परंतु त्यावेळेस दलितांना दर्शनाची परवानगी नव्हती, तेव्हा महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह करून ते मंदिर सर्वांसाठी खुले केले.गावात नवसाला पावणारे भव्य दिव्य असे सिद्धिविनायक मंदिर गोदावरी काठावर वसलेले आहे आणि याच ठिकाणी कुंभमेळा होत आहे.ओढा ठिकाणी गोदा घाट तयार होत असून याच ठिकाणी साधुसंतांना शाही स्नान करता येणार आहे. अशी महान ओळख या गावाची असून या गावात दरवर्षीप्रमाणे यंदाही १एप्रिल २०२६रोजी भैरवनाथ महाराजांची भव्य आशी यात्रा साजरी करण्यात आली. हिंदू धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे भैरवनाथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी सोंग मिरवणुकीचा आनंद लुटला. संध्याकाळी करमणुकीचे साधन म्हणून तमाशा ठेवण्यात आला. त्याचाही आनंद गावकऱ्यांनी लुटला. तसेच मुस्लिम बांधवांच्या वतीने व हिंदू बांधवांच्या एकात्मिकतेने मन्सूर शहा बाबा यांचा संदल काढून सर्वधर्म समभाव याचा आदर्श ओढा गावातील ग्रामस्थांनी जगासमोर एक आदर्श निर्माण करून हम सब एक है हा संदेश जगाला दिला. यात्रेकरिता नाशिक पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शनाचा व यात्रेचा आनंद लुटला.यासाठी ओढा गावातील सरपंच प्रियाताई पेखळे,उपसरपंच योगेश कापसे,ग्रामपंचायत सदस्य,पोलीस पाटील गजानन भोर, यात्रा कमिटीचे अध्यक्ष बाबुराव पेखळे, उप-अध्यक्ष शंकर पेखळे,खजिनदार मधुकर शिरसाट पंच संपत पेखळे, शंकर देवकर, राजू सहाने, आण्णा गुरव, रामचंद्र पेखळे,तसेच गावातील माजी सरपंच साहेबराव पेखळे, मधुकर पेखळे,निलेश पेखळे, तंटामुक्ती अध्यक्ष बबनराव कंक ,संदल कमिटीचे अध्यक्ष अन्वर सय्यद,अब्बास सौदागर तसेच ओढा गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक तसेच यात्रेकरिता नाशिक आडगाव पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य व कायदा सुव्यवस्था व्यवस्थित राबविली त्यामुळेच सर्वांच्या सहकार्याने यात्रा उत्सव संपन्न झाला.



# संपादकीय

## हवे हिरवे छत्र

शहरांच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाच्या शर्यतीत शहरी वृक्षसंपत्तीचे महत्त्व वारंवार दुर्लक्षित केले जात आहे. प्रत्यक्षात झाडे ही केवळ सौंदर्य नव्हे, तर पर्यावरण आणि सार्वजनिक सुरक्षेची अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहेत.असा एकही पावसाळा जात नाही ज्यावेळेस आपल्याला दिसते की झाड गाडीवर कोसळते आणि झाडे पडून मानवी मृत्यू देखील होतात. मेट्रोचा खांब उभारण्यासाठी शेकडो वर्षे जगलेला वटवृक्ष एका रात्रीत तोडला जातो. रस्त्यालगतच्या झाडांमुळे पूर्वी सावली देणारा पदपथ आता उघड्या कॉंक्रीटची पट्टी बनतो. आपण क्षणभर हळहळतो आणि पुढे निघून जातो – परत उंच, रुंद, वेगाने विकास कामे उभारायला. विशेष म्हणजे याच प्रक्रियेत आपण त्याच–त्याच चुका वारंवार करत राहतो. झाडांकडे फक्त शोभेची वस्तू किंवा अडथळा म्हणून बघतो. मुख्य म्हणजे वृक्ष म्हणजे महत्त्वाची शहरी पायाभूत सुविधा आहे हे विसरतो.भारत ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. २०४७ पर्यंत आपल्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्येचे वास्तव्य शहरांमध्ये असेल. मुंबई, पुणे, बंगळूरु, हैदराबाद, दिल्ली ही शहरे केवळ वाढत नाहीत, तर झपाट्याने कायापालट होत आहेत. रस्ते रुंद होत आहेत, उड्डाणपूल उभे राहत आहेत, मेट्रोच्या बोगद्यांसाठी जमिनीखाली खोदकाम सुरू आहे. या प्रत्येक कामाची एक किंमत असते जी प्रकल्पाच्या अंदाजपत्रकात कधीच दिसत नाही. आपल्या शहरी वृक्षसंपत्तीची किंमत, हे संवर्धनाचे म्हणणे नाही. हे पायाभूत सुविधांचे म्हणणे आहे आणि भारतातील शहर नियोजनकार अभियंते, महानगरपालिका अधिकारी आणि धोरणकर्त्यांनी हे स्पष्टपणे ऐकण्याची वेळ कधीच उलटून गेली आहे. झाडे विकासाच्या विरोधात नाहीत. योग्य व्यवस्थापन केल्यास ती स्वतःच 'विकास' आहेत का महत्त्वाचा मूलमंत्र आहे.मी आर्बोरिस्ट आहे, असे सांगितले की अनेकदा समोरच्याचा प्रतिसाद फक्त विनम्रपणे मन डोलवण्यापुरता असतो आणि समज असतो की मी एखाद्या रोपवाटिकेत काम करतो किंवा विकेंडला कुंपण छाटतो. प्रत्यक्षात हे काम त्यापेक्षा कितीतरी अधिक तांत्रिक आणि कितीतरी अधिक महत्त्वाचे आहे. आर्बोरिकल्चर म्हणजे शहरी वातावरणातील वैयक्तिक झाडांचे व्यवस्थापन करण्याचे शास्त्र आणि कला. यात संरचनात्मक धोक्याचे मूल्यांकन, पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वृक्ष–प्रभाव मूल्यांकन, मुळांच्या क्षेत्राचे व्यवस्थापन, बांधकामाच्या काळात झाडाचे छत्र जपणे, झाडांच्या आरोग्याचे निदान आणि झाड तोडणे व टिकवून ठेवणे यांशी संबंधित कायदेशीर व पर्यावरणीय चौकट यांचा समावेश होतो. हे प्रत्येक अर्थाने शहरी पायाभूत सुविधा व्यवस्थापनाचे एक शास्त्र आहे, जे भारताच्या मुख्य प्रवाहातील नियोजनातून जवळपास पूर्णपणे गायब आहे. एका प्रौढ झाडाचा शहरासाठी विचार करा. ते कार्बन शोषून घेते. बाष्पोत्सर्जनाने सभोवतालचे तापमान दोन ते चार अंशांनी कमी करते. पावसाचे पाणी जमिनीत मुरवते. हवेची गुणवत्ता सुधारते, ध्वनिप्रदूषण कमी होते, जैवविविधता टिकते आणि मानसिक स्वास्थ्य, मालमत्तेचे मूल्य आणि सामुदायिक एकात्मता यांवर त्याचे सिद्ध परिणाम होतात. हे हजारो झाडांच्या शहरी जंगलात गुणाकार करा. आर्थिक मूल्य थक्क करणारे आहे आणि ते गमावल्यावरची किंमतही तितकीच मोठी आहे.मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरांमध्ये आर्बोरिकल्चरसाठी सर्वात मोठे आव्हान दिसते. कारण हे शहर असाधारण नैसर्गिक वारसा असलेले आहे – जुने वटवृक्ष जे संपूर्ण चौकांवर छत्र धरतात, किनारपट्टीचे रक्षण करणारी खारफुटीची जंगले, पिढ्यानपिढ्या शहराचे प्रदूषण आणि वेदना शांतपणे सहन करणारी झाडे आणि त्याच वेळी हे एक अखंड पायाभूत दबावाखाली असलेले शहर आहे. गेल्या दशकात एकट्या मुंबईत मेट्रो, किनारी रस्ता आणि महामार्ग प्रकल्पांसाठी हजारो झाडे तोडण्यात आली किंवा कायमची बाधित झाली. यातील काही तोडणे अपरिहार्य होते. अनेक नव्हती. यातील फरक – झाड वाचवणे आणि झाड तोडणे – हा बऱ्याचदा एवढाच असतो की नियोजनाच्या टप्प्यात प्रशिक्षित आर्बोरिस्ट त्या निर्णय प्रक्रियेत होता का? सुरक्षिततेचा आयाम तर आणखीच महत्त्वाचा आहे. मुंबईच्या गर्दीच्या रस्त्यांवर मुळांवर दबाव, चुकीच्या पद्धतीने छाटणी आणि बांधकामाच्या नुकसानीमुळे झाडे धोकादायक बनतात. संरचनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेले झाड अप्रशिक्षित डोळ्यांना वर्षानुवर्षे हिरवेगार आणि निरोगी दिसू शकते आणि एक दिवस अचानक कोसळते. प्रमाणित आर्बोरिस्टकडून जोखीम मूल्यांकन हे ऐषोआरामाची गोष्ट नाही ती सार्वजनिक सुरक्षा आहे.जागरूकता आणि शिक्षण आवश्यक आहे पण पुरेसे नाही. भारतीय शहरांचा झाडांशी असलेला संबंध बदलण्यासाठी धोरणात्मक हस्तक्षेप हवा, आणि तो तातडीने हवा. रोपटे लावणे म्हणजे प्रौढ झाड जतन करणे नव्हे. शंभर रोपटी एका ८०–वर्षांच्या वटवृक्षाची जागा घेत नाहीत. हा फरक धोरणात रुजवायला हवा. कॉर्पोरेट भारतालाही यात भूमिका आहे. खऱ्या अर्थाने सार्थक ईएसजी बांधिलकीमध्ये प्रकल्प स्थळांवर आर्बोरिकल्चरल कसोशीचा समावेश होतो. टिकाऊपणाबद्दल गंभीर असलेल्या कंपन्यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी व्यावसायिक वृक्ष–प्रभाव मूल्यांकन करवून घ्यायला हवे. काम झाल्यावर गच्चीवर रोपटे लावणे हे ग्रीनवॉशिंग आहे.अनावश्यक तोडण्यात येणारी झाडे, चुकीच्या छाटणीने खालावणारे छत्र, अज्ञानी बांधकाम प्रथांमुळे मरणारे वारसा वृक्ष आणि अधिकाधिक गरम, गोंगाटमय आणि श्वास घेणे कठीण होत जाणारी शहरांची सध्याची परिस्थिती आहे. यावर कुठेतरी आळा बसणे गरजेचे आहे. अशी शहरे जिथे शतावर्षीय वटवृक्ष शाळेसाठी अडथळा नसतो, तर ती सर्वात मौल्यवान संपत्ती असते. शहरे वाढत राहणार आहेत. पण ती वाढ झाडांच्या विरोधात नसून त्यांच्या सहजीवनातून व्हायला हवी. 'वाढती शहरे, हिरवे छत्र' ही केवळ घोषणा नाही; ती भविष्यातील शहरांची रचना आहे. अशी शहरे जिथे पायाभूत सुविधा प्रकल्पांचा पहिला प्रश्न कोणती झाडे काढायची? असा नसून कोणती झाडे वाचवता येतील? असा असेल. मुंबई या बदलाचे नेतृत्व करू शकते आणि करायलाच हवे.

# उद्योगांना एलपीजीचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील-राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात कार्यरत असलेली प्रत्येक विदेशी कंपनी ही राज्याचीच आहे, या भूमिकेतून राज्य शासन सर्वतोपरी काळजी घेत आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर विदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसेच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासनामार्फत आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगून या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केली.राज्यातील एलपीजीच्या पुरवठ्याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने आणि शिपिंग कंपन्यांकडून दरवाढ झाल्याने अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या निर्देशानुसार राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली परिस्थिती हाताळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एलपीजी पुरवठ्याचे टप्प्याटप्प्याने वितरण सुरू असून प्राधान्य क्षेत्रांना दिलासा देण्यात येत आहे.एलपीजीच्या काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष आणि हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आले आहेत. हे क्रमांक सर्व नागरिक आणि उद्योजकांपर्यंत पोहोचविण्याची सूचना करुन मंत्री जयकुमार रावल यांनी नागरिक आणि उद्योगांकडून येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्याचे तसेच दरवाढ किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले.सध्यस्थितीत कोणत्याही विदेशी उद्योगांना एलपीजीचा पुरवठा झाला नसल्याबाबत तक्रार नाही. त्यामुळे उद्योजकांनी काळजी न करता सहकार्य करावे, असे आवाहन



सचिव डॉ.गवांदे यांनी यावेळी केले.
केंद्र सरकारच्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात हॉस्पिटल्स, शैक्षणिक व सामाजिक संस्था, दुसऱ्या टप्प्यात रेस्टॉरंट्स व अन्न उद्योग, तर तिसऱ्या टप्प्यात कामगारप्रधान उद्योगांना एलपीजी पुरवठा करण्यात येत आहे. या अनुषंगाने उर्वरित उद्योगांची यादी अंतिम करून पुढील एक–दोन दिवसांत पुरवठा सुरळीत करण्यात येणार असल्याची माहिती श्री.डांगे यांनी यावेळी दिली. बैठकीत पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) सुविधेच्या विस्ताराला गती देण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाबाबत माहिती देण्यात आली. शहर गॅस वितरण प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या जलदगतीने देण्यात येत असून रस्ते खोदकाम, पाईपलाईन टाकणे आदी कामांना २४ तास परवानगी देण्यात आली आहे. बहुतांश कामे या महिन्यात पूर्ण होतील असे यावेळी सांगण्यात आले.या बैठकीत उपस्थित परदेशी प्रतिनिधींनी राज्य शासनाच्या पारदर्शक आणि सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले. संकटाच्या काळात केंद्र व राज्य शासन एकत्रितपणे काम करत असून पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याबद्दल त्यांनी यावेळी समाधान व्यक्त केले.सध्याचे संकट तात्पुरते असून परिस्थिती लवकरच सामान्य होईल, असा विश्वास व्यक्त करुन राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी राज्यातील उद्योग व नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले.

# कोप्रोली ग्रामस्थांनी काळे पिवळे मार्किंग पट्टे जाळून एमएमआरडीए व राज्य सरकारचा केला निषेध

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

एमएमआरडीएने उरण तालुक्यातील कोप्रोली गावच्या वेशीवर काळे पिवळे चौकटीत मार्किंगला केले होते. गुरुवार दिनांक २.४.२०२६ रोजी कोप्रोली ग्रामस्थ व सर्व पक्षांचे प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येत या मार्किंगला काळे फासून निषेध केला. उपस्थितांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा तीव्र निषेध करत या मार्किंगवर टायर जाळून सरकार आणि एमएमआरडीएला इशारा दिला आहे.
जमीन, घर आणि गाव वाचवा
एमएमआरडीए हटवा
जमीन आमच्या हक्काची
नाही कुणाच्या बापाची
असे नारे देत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी एल्गार केला आहे. तत्पूर्वी




एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी सरकारने तिसऱ्या मुंबईसाठी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या शासन निर्णयाची माहिती दिली. सरकारचे धोरण फसवे आणि शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याला बळी पडू नये. आपण संघटीत राहून संघर्ष केला नाही तर भविष्यात आपली मूळ गावठाणाबाहेरील घरेही बेकायदेशीर ठरतील. सरकारने या सर्व घरांना सनद ( प्रॉपर्टी कार्ड ) देऊन सुरक्षित करावे तसेच मूळ गावठाणाबाहेर ५०० मिटर पर्यंत गावठाण क्षेत्र जाहीर करावे. एमएमआरडीएने गावोगावी अशा प्रकारचे मार्किंग करून हद्दी निश्चित करत बेकायदेशीरपणे सर्वेक्षण सुरू केलं आहे. त्याला सर्वत्र विरोध होत आहे. याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, एड. पर्जन्य म्हात्रे, विपुल म्हात्रे, शशिकांत पाटील, प्रवीण म्हात्रे, अमेय पितळे, दिलीप म्हात्रे, हितेश म्हात्रे, अमृत म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, ओमकार गावंड, हर्षद पाटील, ओंकार म्हात्रे, सौरव पाटील, नमोद म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# उरण मध्ये श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

उरण शहरात तसेच उरण तालुक्यातील विविध ग्रामीण भागात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पागोटे,हनुमान कोळीवाडा, वेश्वि,वशेणी, करंजा आदी गावात तसेच उरण शहरात भाजी मार्केट बाजारपेठ तसेच गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला.उरण शहरातील गणपती चौकात श्री हनुमान जन्मोत्सव सामाजिक मंडळ उरण यांच्या वतीने पहाटे ४ वाजता महापूजा, पहाटे ५ वाजता हभप सुधीर विश्वनाथ बाळ यांचे सुश्राव्य असे किर्तन झाले.भाविक भक्तांना कल्पेश ठक्कर यांच्या माध्यमातून उपवासाच्या खिचडीचे वाटप करण्यात आले. सकाळी ८ ते १२ या वेळेत श्री गजानन प्रसादिक भजन मंडळ यांचे भजन झाले. श्री गजानन प्राथमिक भजन मंडळाचे बुवा वसंत मांडेलकर,गणेश सावंत, शैलेश राऊत, भारत पाटील, जगदीश भोईर,भालचंद्र म्हात्रे, कु. वेदांत,सन्नी मांडेलकर आदींनी उत्तम असे भजन गाऊन रसिक प्रेषक भाविक भक्तांना मंत्र मुग्ध केले.दुपारी १२ ते ३ या वेळेत कै. सुनिता महादेव ढोले, कै. मीना के रूपचंदानी यांच्या स्मरणार्थ महाप्रसाद देण्यात आले.त्यानंतर शारदा संगीत भजन मंडळ विचुंबे यांचे भजन झाले. शेवटी पालखी मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीला श्री गजानन प्रासादिक भजन मंडळाची साथ संगत लाभली.मंदिरात श्री हनुमान मूर्तीचे दर्शन घेतलेल्या विविध प्रतिष्ठित मान्यवरांचे यावेळी शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.दिवसभर चाललेल्या विविध कार्यक्रमांना भाविक भक्तांचा उत्तम प्रतिसाद लाभला.भाविक भक्तांची दिवसभर गर्दी पहावयास मिळाली. सर्वच भावीक भक्तांनी शांततेत रांगेत उभे राहून शिस्तीने दर्शन घेतले.सर्वच कार्यक्रम उत्तमपणे संपन्न झाले.सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष अशोक कडू, उपाध्यक्ष महेश अधिकारी, कार्याध्यक्ष विपुल पारेख, सचिव ऍड.रोहित पाटील, सहसचिव ऍड.रेखा पाटील, खजिनदार धनंजय भागवत, सहखजिनदार मनोज म्हात्रे,सल्लागार विठ्ठल ममताबादे,व्यवस्थापक निर्मला ममताबादे, ह भ प भालचंद्र म्हात्रे, रघुनाथबुवा हातनोलकर यांच्यासह सर्व कार्यकारी पुरुष सभासद, कार्यकारी महिला सभासद – सुविधा म्हात्रे,प्राजक्ता भागवत, मिलिंदा माळी यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.



# रायगड किल्ला पाहून मी धन्य झाले–रागिणी नायक

## कॉंग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ.रागिणी नायक, जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत रायगडावर!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार प्रत्यक्षात जगणारे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, तसेच कॉंग्रेसच्या दिल्लीतून आलेल्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक बुधवारी (ता.१) सकाळी रायगड किल्ल्यावर शिवरायांच्या चरणी नतमस्तक झाले. यावेळी रायगड किल्ला आणि शिवरायांची महती फक्त ऐकून असलेल्या रागिणी नायक रायगड किल्ला 'याचि देही याचि डोळा' पाहून भारावून गेल्या. शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. असा राजा जगात झाला नाही आणि होणारही नाही. जेथे शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. तोच हा रायगड किल्ला! असे कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी राष्ट्रीय प्रवक्त्या



रागिणी नायक यांना सांगितले. 'आज मी शिवाजी महाराज यांचा रायगड किल्ला पाहून धन्य झाले!' असे उद्गार रागिणी नायक यांनी यावेळी काढले. यावेळी शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, युवक अध्यक्ष निखिल ढवळे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आपण चारचाकी घेतली; हिचा वापर आपल्या घरगुती कामा बरोबर बौद्ध धम्म प्रसारासाठी करणार!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महामानव बौद्धीसत्व प.पूज्य विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच सुखसोयी आपणास प्राप्त झाल्याने समाजबांधव धम्मबंधू अतुल खंडेराव मोरे यांनी चारचाकी मारूती सुजीकी कंपनी क्रमांक एम एच ०३ एफ डी १५४५ महागडी गाडी खरेदी केली आणि भिक्खू संघाज युनायटेड बुध्दीस्ट मिसन सर्वोदय महाबुध्दविहार टिळकनगर चेंबूर पश्चिम मुंबई येथे महाथेरो विपश्यनाचार्य भन्ते डॉ.राहूल बोधी यांच्या शुभ हस्ते बौद्ध संस्कार पध्दतीने पुजापाठ करून मोठ्या उत्साहात उद्घाटन सोहळा संपन्न केला असता भन्ते यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आपणास चार चाकी गाडी मिळाली, आपल्या समाज्याला वैभव प्राप्त होवून प्रगतीपथावर गेला पण अजूनही बौद्ध धम्म प्रचार प्रसार होवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत बौद्धमय करण्यासाठी आपण सर्वांनी बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार केला पाहिजेत.या कामी आपले वाहने उपयोगात आली पाहिजेत सदर अतुल मोरे यांची गाडी त्यांच्या घरगुती कामा बरोबरच



धम्म प्रचार प्रसारसाठी कामी येईल असा विश्वास व्यक्त करून मंगल मैत्रिचा आशिर्वाद दिला.सदर प्रंसगी सर्वश्री रिपब्लिकन एम्प्लॉईज फेडरेशनचे केंद्रीय सरचिटणीस आत्माराम पाखरे,रिप.पॅथर जेष्ठ नेते,भाई कदम, समाजभूषण सो.ना.कांबळे.उपाध्यक्ष मुं.प्र.रिप पक्ष आ, रिप. ए. फे. केंद्रीय खजिनदार सिद्धार्थ रणपिसे,सामाजिक नेते शैलेंद्र मस्के,अतुल मोरे यांचे कुटुंबीय बहिणबाई शलाका मोरे,भावजय वैशाली मोरे,आदिने मान्यवरांना पेढे,मिठाई वाटप करून चार चाकी गाडी घेतल्याचा आनंदोत्सव साजरा केल्या प्रंसगी अतुल मोरे यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छा वर्षा होत आहे.

# पुण्यात पडलेला अवकाळी पावसाने प्रशासनाचे उखळ पांढरे

दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात पडलेला अवकाळी पावसाने शहराची दैना दिसत होती कोथरूड,शिवाजीनगर,कर्वेनगर,सिंहगड रोड, बाणेर अशा अनेक ठिकाणी रोडवर पाणीच पाणी साचलेले दिसत होते यात वाहन चालकांची दैना तर झालेली दिसत होती तर अनेक ठिकाणी घरात पाणी ,दूकानात पाणी साचल्याने अनेकांचे नूकसान झालेले होते अनेक ठिकाणी चेंम्बरची दूरावस्था, खालीवर चेंम्बर, नाल्या मध्ये कचरा, रोडवर माती, दगड खडी वाळू सारखे प्रकार दिसत असतांनाही महापालिकेचे अधिकारी झोपा घेतात काय तसेच महापालिका यावर करोडो रूपये निधी उपलब्ध करणे मग तो निधी फक्त ठेकेदार आणि अधिकारी यांच्या घश्यात घातला जातो काय तसेच उन्हाळ्या नंतर पावसाळा सूरू होणार याचे नियोजन आता पासून करणे गरजेचे असतांनाही महापालिकेचे अधिकारी झोपा काढत आहे यात जनता भरडली जात आहे याचे नियोजन आता पासून का करण्यात येत का नाही याचे उत्तर जनतेला महापालिकेने द्यावे




# भगवानगडाचे विद्यार्थी केशव शास्त्री यांची जय हनुमान संस्थान, राणेगावच्या महंतपदी नियुक्ती

## महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी आपल्या लाडक्या शिष्याचे केले तोंड भरून कौतुक

दैनिक वादळ वार्ता
**भगवानगड । प्रतिनिधी**

राणेगाव ग्रामस्थांच्या विनंतीनुसार व ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट संचलित ज्ञानेश्वरी विद्यापीठ, श्री क्षेत्र भगवानगड येथील विद्यार्थी ह.भ.प.श्री.केशव महाराज शास्त्री भगत यांची राणेगांव येथील जय हनुमान संस्थानच्या महंतपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे राणेगांवसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून महाराजांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महंत केशव महाराज शास्त्री भगत हे महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांचे शिष्य असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी धार्मिक व सामाजिक कार्यात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर हनुमान संस्थानच्या महंतपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भव्य जल्लोष करत राणेगावकरांनी महाराजांचे स्वागत केले. महाराजांच्या स्वागतासाठी श्री क्षेत्र भगवानगडावरून राणेगावपर्यंत मोटारसायकल रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला होता. ऐश्वर्यासंपन्न संत श्री भगवानबाबांच्या नावाचा जयघोष करत जय हनुमान आणि महाराजांच्या जयघोषांनी परिसर दणाणून गेला होता. राणेगावमध्ये आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी आणि ढोल-ताशांच्या



गजरात महाराजांचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत आनंद व्यक्त केला. महंत केशव महाराज शास्त्री भगत यांनी यावेळी बोलताना, माझ्यावर सोपविण्यात आलेली ही जबाबदारी मी निष्ठेने पार पाडेन. संस्थानच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपत समाजसेवा अधिक प्रभावीपणे करण्याचा प्रयत्न करेन असेही सांगितले. दरम्यान, महंत डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानाचा कारभार अधिक सक्षमपणे पुढे नेला जाईल असा विश्वासही नूतन महंत केशव महाराज शास्त्री यांनी व्यक्त केला. कार्यक्रमामध्ये बोलताना महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी सांगितले की, भगवानगडाचा प्रत्येक विद्यार्थी हा भगवान श्री ज्ञानोबारायांच्या ज्ञानरुपी मोगऱ्याला लागलेली एक एक कळी आहे. त्या प्रत्येक कळीचं श्री क्षेत्र भगवानगडावरील ज्ञानेश्वरी विद्यापीठामध्ये सुंदर असं ज्ञानरूपी फुल बनवले आहे. त्या ज्ञानरूपी फुलांचा सुगंध आज महाराष्ट्र चाखत आहे. यावेळी कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र भगवानगडाचे प्रधानाचार्य, ह.भ.प.श्री.नारायण महाराज शास्त्री, महंत भगवान महाराज शास्त्री,महंत नवनाथ महाराज शास्त्री,महंत अतुल महाराज शास्त्री, महंत हनुमंत महाराज शास्त्री,महंत संतोष महाराज शास्त्री, महंत गणेश महाराज शास्त्री इत्यादींसह भगवानगडावरील सर्व साधक मंडळींची उपस्थिती होती. तसेच समस्त राणेगांव व राणेगांव परिसरातील शेकडो भाविकांची कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती होती.

# करजगांव येथे वीज पडून शेतकऱ्याची दुभती गाय ठार!

## तलाठी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांनी केला पंचनामा

### शेतकर्याला मदत मिळवुन देण्याची आम आदमी पार्टीची जिल्हाधिकार्यांकडे मागणी!

दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

बोरशे गुरुजी कर्म देते दैव नेते अशी गत करजगांव येथील शेतकऱ्यांची झाली आहे. सध्या सुरू असलेल्या अवकाळी पावसामध्ये गारपीट आणि विजेच्या तडाखा चालू आहे. यामध्ये करजगांव येथील परमेश्वर संतोषराव लोखंडे तालुका भोकरदन जिल्हा जालना यांची संकरित गाय वीज पडुन ठारझाली आहे.त्यामध्ये त्यांचे दीड लाखाचे नुकसान झाले आहे. अतिशय हालाखीच्या परिस्थितीमध्ये जगणाऱ्या शेतकऱ्यांनी व्याजाने पैसे काढून गाय घेतली होती.मोल मजुरी करून संसाराला पुरेसं हातभार लागत नसल्याने संकरित गायीच्या दुधाचा व्यवसाय करून दोन पैसे मिळतील या आशेवर इकडून तिकडून व्याजाने पैसे जमा करून गाय घेऊन दोन पैसे मिळवण्याचे स्वप्न या शेतकऱ्याने पाहिले होते. परंतु नियतीला ते मान्य नव्हते सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अवकाळी पावसाने



थैमान घातले आहे त्याचा तडाखा भोकरदन तालुक्यातील करजगांव आणि परिसराला बसला असून वीज पडुन गाय ठार झाली आणि या बिचाऱ्या शेतकऱ्यांचे स्वप्न धुळीला मिळाले आहे.आशेचा किरण म्हणून शासनाकडून मिळणारी आपत्ती बाबत शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची अपेक्षा असून मुर्तड सजाला असणाऱ्या तलाठी दाहीजे मॅडम आणि पशुवैद्यकीय अधिकारी डॉ आर. वि.केळोदे व डॉ.ज्ञानेश्वर जगताप जळगाव सपकाळ यांनी जायमोक्यावर हजर राहुन पंचनामा केला आहे. माननीय जिल्हाधिकारी यांच्या कडुन जालना यांच्या कडुन सकारात्मक विचार करून संबंधित शेतकऱ्याला शासकीय मदत मिळवून दिल्या जाईल ही अपेक्षा आहे पंचनामा करतेवेळी त्यांच्या शेजारी शेतकरी श्रीमान हरीभाऊ विठ्ठल नरवाडे, श्री रमेश दौलतराव लक्कस,श्री कल्याण शेषराव लोखंडे, श्री भागवत रतन नरवाडे, सचिन समाधान लोखंडे यांच्यासह गावकरी हजर होते. या शेतकऱ्याला मदत मिळवून देण्यासाठी आम आदमी पार्टी पाठपुरावा करणार असल्याचे बोरशे गुरुजींनी कळविले आहे.

# गॅस व डिझेल वरती पर्याय म्हणून आम्ही मोठ्या हॉटेल साठी चपाती, भाजी, वरण, भात, चहा बनवण्यासाठीची लाईट वरील इंडक्शन मशीन तयार केली-विनोद जोगदंड

## मशीन द्वारे गॅसच्या तुलनेमध्ये ६० टक्के बचत होते

दैनिक वादळ वार्ता
**भूम । प्रतिनिधी**

सध्या जानवत असलेल्या गॅस टंचाईमुळे हॉटेल व्यवसायावर मोठे संकट ओढवले असताना भूम येथील निर्मल खवा उद्योग यांनी पर्यायी ऊर्जेचा प्रभावी वापर करत विकसित केलेल्या इंडक्शन तंत्रज्ञानामुळे हॉटेल व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळत आहे. या उपक्रमामागे विनोद जोगदंड यांचा दूरदृष्टीपूर्ण पुढाकार महत्त्वाचा ठरला आहे. सध्या गॅस सिलिंडरचा अपुरा व अनियमित पुरवठा, सतत वाढणारे दर, अचानक संपणारा गॅस आणि वेळेवर उपलब्धता न होणे या कारणांमुळे हॉटेल चालकांना रोजच्या स्वयंपाकाचे नियोजन करणे कठीण झाले आहे, अनेक ठिकाणी ग्राहकांची वाढती गर्दी असतानाही स्वयंपाक थांबवावा लागणे, ऑर्डर उशिरा पूर्ण होणे, अतिरिक्त खर्च वाढणे आणि ग्राहक नाराजी यांसारख्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे व्यवसायावर थेट परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर विनोद जोगदंड यांनी लाईटवर चालणारी अत्याधुनिक इंडक्शन मशीन तयार करून हॉटेल उद्योगाला




पर्याय उपलब्ध करून दिला असून या मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात चपाती, भाजी, वरण, भात तसेच चहा यांसारखे पदार्थ जलद आणि सातत्याने तयार करता येत आहेत, त्यामुळे गॅस व डिझेलचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. विशेष म्हणजे या तंत्रज्ञानामुळे गॅसच्या तुलनेत सुमारे ६० टक्के खर्चाची बचत होत असल्याचे समोर आले असून वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही बाब अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. याबाबत विनोद जोगदंड यांनी हॉटेल व्यावसायिकांना आवाहन करत सध्याच्या गॅस टंचाईच्या संकटात पारंपरिक पद्धतीवरच राहणे परवडणारे नाही, आधुनिक पर्याय स्वीकारणे गरजेचे आहे, इंडक्शन तंत्रज्ञानाचा वापर करून खर्च वाचवा आणि व्यवसाय सुरळीत ठेवा, असे सांगितले. गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या अनिश्चिततेत हॉटेल व्यवसाय टिकवणे आव्हानात्मक झाले असताना निर्मल खवा उद्योग यांचा हा उपक्रम व्यवसायिकांना स्थैर्य देणारा ठरत असून पर्यायी ऊर्जेचा वापर, खर्चात बचत आणि कामकाजातील सातत्य साध्य करणारे हे तंत्रज्ञान भविष्यात हॉटेल उद्योगासाठी नवा मार्ग दाखवणारे ठरत आहे.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंत्ती निमित्त

# विद्युत रोषनाई व रस्त्यांची डागडुजी करणे बाबत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आयुक्त नांदेड यांना निवेदन

## वंचित बहुजन युवा आघाडी कार्यकर्ते-सम्राट आढाव

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नवीन नांदेड -सिडको-हडको नवीन नांदेड परिसरात दरवषी मोठ्या हर्षो उल्हासात जयंत्ती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राच्या मिरवणुकीचे आयोजन सिडको-हडको शहरातील मुख्य मार्गाने करण्यात येते. त्यामुळे भिम जन्मोलावाच्या तत्पूर्वी आपल्या प्रशासनाकडून आमच्या खालील मागण्यांची दखल घेऊन त्या पूर्ण कराव्यात,

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, गुरुवार बाजार, सिडको नवीन नांदेड येथे सिडको-हडको परिसरातील सर्व बहुजन बांधव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरातील स्मारकास अभिवादन करयासाठी मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क परिसरात एल.ई.डी. फोकस, विद्युत रोषणाई सह परिसर स्वच्छ करुन पार्कचे सुशोभिकरण करावे.

२) डॉ. बाचासाहेव आंबेडकर चौक, लातुर फाटा सिडको नवीन नांदेड व माता रमाई आंबेडकर चौक सिडको नवीन नांदेड येथील परिसर देखील रंगरंगोटीसह स्वच्छ करावा.३) वस्ताद लहुजी साळवे नगर, वाघाळा हडको नवीन नांदेड पासून ते सिडको हडको परिसरातील मुख्य रस्त्यांची तात्काळ डागडुजीसह मजबुतीकरण करावे व सर्व स्ट्रीट लाइंट तात्काळ चालू करावे.

४) सिडको हडको नवीन नांदेड परिसरातील सर्व बुध्द विहार व स्मारक परिसरात आपल्या प्रशासनामार्फत विद्युत रोषणाई करावी.

आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना भेटून वंचित बहुजन आघाडी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले वरील सर्व मागण्या मान्य करुन मार्गे लावाव्या ही विनंती करण्यात आली




# महाराष्ट्र साहित्य भूषण राज्यस्तीय पुरस्काराने नवनाथ रणखांबे सन्मानित



दैनिक वादळ वार्ता
**पुणे । प्रतिनिधी**

अनित्य प्रकाशन व वारकरी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुस्तक प्रकाशन व पुरस्कार सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक विजयकुमार भोईर, प्रमुख पाहुणे साहित्यिक भारत सातपुते, साहित्यिक नवनाथ रणखांबे, संपादिका सुप्रिया जाधव, अनित्य प्रकाशनाचे जगदेव भटू, वारकरी प्रकाशनाचे राहुल मुंडे आदी.मान्यवरांच्या उपस्थित स्काऊट ग्राउंड सदाशिव पेठ पुणे येथे नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी जीवनसंघर्षकार फेम नवनाथ आनंदा रणखांबे यांना त्यांच्या साहित्य क्षेत्रातील भरीव कामगिरी बद्दल राज्यस्तरीय महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्काराने साहित्यिक विजयकुमार भोईर, साहित्यिक भारत सातपुते, अनित्य प्रकाशाचे प्रकाशक जगदेव भटू यांच्या हस्ते अनित्य प्रकाशनाच्या वतीने गौरवण्यात आले. नवनाथ रणखांबे हे विविध आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय ऐतिहासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड धारक असून आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय , राज्यस्तीय विविध पुरस्काराने ते सन्मानित आहे. साहित्य क्षेत्रात ते जीवनसंघर्षकार म्हणून प्रसिद्ध आहे. यावेळी विजयकुमार भोईर राज्यस्तरीय महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कार , श्रीकृष्ण टोबरे राज्यस्तरीय जागल्या पुरस्कार, सुरेखा गायकवाड राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार इत्यादी. पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड उमाकांत आदमाने केले.

# मोहफूल संकलनाचा हंगाम सुरु; वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावराने मजुरांचा जीव धोक्यात!

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

किनवट तालुक्यात वसंत ऋतूच्या सुरुवातीस मोहफूल संकलनाचा हंगाम सुरू झाला आहे. दिवाळीनंतर कामाच्या शोधात बाहेर गेलेले अनेक मजूर गुढीपाडव्याच्या सुमारास पुन्हा गावाकडे परतून या कामात गुंतले आहेत. जंगल परिसरात मोठ्या प्रमाणात मोह वृक्ष असल्यामुळे हा हंगाम ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा रोजगाराचा स्रोत ठरतो.

थंड पहाटेच्या वातावरणात महिला, पुरुष तसेच वृद्ध नागरिक टोपल्या व पोती घेऊन जंगलात जाऊन झाडाखाली पडलेली मोहफुले गोळा करतात. ही फुले वाळवून बाजारात विकली जातात. स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत मोहफुलांना चांगली मागणी असल्याने अनेक कुटुंबांना यामधून आर्थिक दिलासा



मिळतो.

मात्र, याच वेळी जंगलात वाघ, बिबट्या आणि अस्वल यांसारख्या वन्यप्राण्यांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पानगळ झाल्याने जंगल मोकळे दिसत असले तरी वन्यप्राणी सहज दिसत नाहीत, त्यामुळे हल्ल्याची शक्यता वाढते. यापूर्वीही काही नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.

दरम्यान या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांकडून वन विभागाने मोहफूल संकलनाच्या काळात विशेष सुरक्षा उपाययोजना कराव्यात, वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा आणि संकलन करणाऱ्या नागरिकांना संरक्षण मिळावे, अशी मागणी ग्रामीण भागा जोर धरत आहे. एकूणच, वसंत ऋतूत सुरू होणारे मोहफूल संकलन हे ग्रामीण भागासाठी रोजगाराचा महत्त्वाचा स्रोत ठरत असले तरी त्याला सुरक्षिततेची जोड देणे काळाची गरज ठरत आहे. काही प्रमाणात का होईना, मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध होतो पहाटेच्या थंड वातावरणात महिलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण टोपल्या, पोती घेऊन जंगलात जातात आणि झाडाखाली पडलेली फुले गोळा करतात. ही फुले नंतर स्वच्छ करून उन्हात वाळवली जातात आणि बाजारात विक्रीसाठी तयार केली जातात. मोहफूलाला स्थानिक तसेच बाहेरील बाजारपेठेत चांगली मागणी असून त्यापासून विविध उत्पादने तयार

केली जातात, त्यामुळे ग्रामीण कुटुंबांना यामधून काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळतो. किनवट, बोधडी, इस्लापूर, आप्पारावपेठ आणि मांडवी वनपरिक्षेत्रात वन्यप्राण्यांचा वावर जास्त असल्याने नागरिक भीतीच्या छायेत काम करत आहेत. उदरनिर्वाहासाठी दुसरा पर्याय नसल्याने ते जीव मुठीत धरून मोहफूल संकलन करत आहेत. या पार्श्वभूमीवर वन विभागाने विशेष सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तसेच एकट्याने जंगलात न जाता समूहाने जावे व सतर्क राहावे, असे आवाहन वनक्षेत्रपाल प्रमोद राठोड यांनी केले आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी : यंदाचा निकाल १००%

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत महाविद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. काही विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या परीक्षेत महाविद्यालयाचा अंतिम वर्षाचा निकाल १००%, तृतीय वर्षाचा निकालही १००%, आणि द्वितीय वर्षाचा निकाल ९०% लागला आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, नियमित अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालील प्रमाणे आहे

बीपीटी अंतिम वर्ष ( १००% निकाल )
प्रथम क्रमांक श्रावस्ती जगताप = ६२%
द्वितीय क्रमांक शामल चव्हाण = ६१.५%
तृतीय क्रमांक मनीषा होके = ५७.८७%

बीपीटी तृतीय वर्ष ( १००% निकाल )
प्रथम क्रमांक अलिशा काटे = ६६%
द्वितीय क्रमांक श्रुती उन्हाळे = ६५.२%
तृतीय क्रमांक मानसी जोंधळे = ६४.८%

बीपीटी द्वितीय वर्ष ( ९०% निकाल)
प्रथम क्रमांक यशराज पाटील = ६०%
द्वितीय क्रमांक अमन शेख = ५९.८५%
तृतीय क्रमांक राहुल पवार = ५९.४२%

महाविद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, भविष्यातही असेच यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव उज्वल करण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अग्रगण्य संस्थान म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



## डोणगांव बु येथील बारस यात्रेची शिवभक्त गजानन पाटील यांच्या महाआरतीने सांगता



**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील डोणगांव बु येथील बारस यात्रेची सांगता आज श्री शिवभक्त गजानन पाटील देशमुख यांच्या महाआरतीने झाली सलग पाच दिवस चाललेल्या बारस यात्रेत काठ्या कावडी वस्त्र परिधान,रुद्रापूर गावाची मानाची काठी आगमन आबंली शिवपार्वती विवाह सोहळा काठ्या कावडीची टाळ मृदंगाच्या जयघोषात वाजत गाजत गावभर भव्य मिरवणूक मिरवणूकीत महिला आरत्या व कलश डोक्यावर घेऊन सहभागी तर पारंपरिक मनोरंजनासाठी लावणीचा फड कुस्ती दंगल पाच दिवस चाललेल्या बारस यात्रेची शिवभक्त गजानन पाटील देशमुख यांच्या महाआरतीने झाली.

## काला संत करतात तर त्याचे वाटप भगवंत करतो-ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

काला करण्याचा अधिकार संतांना आहे मात्र या काल्यामध्ये सहभागी होऊन त्या प्रसादाचे वाटप मात्र स्वतः भगवंत करतो असे प्रतिपादन महंत ह.भ.प. श्रीराम महाराज विडेकर यांनी केले.विडा येथे प्रतिवर्षाप्रमाणे श्री राजा हनुमान महाराज जन्मोत्सव सोहळ्या निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलत होते.याप्रसंगी त्यांनी संतनिळोबारायांनी अभंगाच्या माध्यमातून देव आणि भक्त एकत्र होऊन काला करतात त्या काल्याचे विशेषत्व सांगणा-या अभंगावर निरूपण केले.काला करीती संतजन सवे त्यांच्या नारायण वाटी आपुल्या निज हस्ते
भाग्याचा तो पावे तेथे
लाही शीत लागे हाती
दोष देखोनिया त्या पळती निळा म्हणे क्षीराचा बुंद लगता पावे ब्रह्मानंद हा अभंग घेतला



भगवंताचे भक्त काला करायला सुरुवात करतात तेव्हा भगवान परमात्माला देखील चैन पडत नाही आणि तो भगवान परमात्मा स्वतःच त्यांच्यामध्ये सहभागी होऊन तो वाटप करतो आणि हा काला जो भाग्यवान आहे त्यालाच प्राप्त होतो.या काल्याचे विशेषत्व असे की,त्याचे एक जरी शीत किंवा लाही हाताला लागली तरी सर्व दोष पळून जातात आणि हा प्रसाद प्राप्त झाला तर ब्रह्मानंदाची प्राप्ती होते एवढे सामर्थ्य या काल्याचे आहे असे सांगितले.याप्रसंगी ह.भ.प.मनोज महाराज, ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज शास्त्री,ह.भ.प. तुकाराम महाराज, मृदंगाचार्य अरुण महाराज,दादा महाराज मेटे,कल्याण आप्पा येवतेकर,रामहरी काटकर,रामहरी आंधळे, सखारामजी कदम, सुनील महाराज आंधळे, बापूराव मेटे यांच्यासह विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे,दत्तात्रय ठोंबरे,काका जाधव,बबन पवार,तुकाराम पटाईत, बाळू निर्मळ,बाबासाहेब पटाईत, बळीरामदेशमुख, सरपंच सुरज पटाईत, गुणवंत बहुलेकर, कागदे महाराज,जगन्नाथ पटाईत,धनराज पवार, पराक्रम घुटे यांच्यासह परिसरातील भाविक -भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी निवृत्त पोलीस उप अधीक्षक दिलीपरावजी काळे साहेब यांची महाप्रसाद पंगती होती. कार्यक्रमाचे यशस्वीते साठी राजा हनुमान प्रतिष्ठान व समस्त युवा जणांनी सहकार्य केले.

## श्री छत्रपती राजर्षी शाहू बँकेची नेत्रदीपक कामगिरी;२७ कोटी ४४ लाखांचा विक्रमी नफा!

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या 'श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि.'ने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये नेत्रदीपक कामगिरी केली आहे.दि.३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने २७ कोटी ४४ लाख रुपयांचा भरघोस नफा मिळवून सहकार क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला आहे.सातत्यपूर्ण नियोजन आणि पारदर्शक कामकाजामुळे ही यशस्वी कामगिरी शक्य झाल्याचे बँकेने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

आर्थिक स्थितीवर एक नजर

बँकेने दिलेल्या माहिती नुसार,सध्या महाराष्ट्र राज्यात बँकेचे ४६ शाखांचे जाळे विस्तारलेले आहे.बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत असून त्याची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.



एकूण ठेवी- १५४८२३.६९ लक्ष रुपये
एकूण कर्ज- ९२९२३.१७ लक्ष रुपये
भाग भांडवल- ४६१४.८५ लक्ष रुपये
एकूण व्यवसाय- २४७७४६.८६ लक्ष रुपये
ढोबळ नफा (Gross Profit)- २७४४.१७ लक्ष रुपये

एनपीए (NPA) मध्ये बाजी

बँकेने थकीत कर्जाच्या बाबतीत अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. बँकेचा ग्रॉस एनपीए NPA 2.49% असून, सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे बँकेने सलग चार वर्षांपासून नेट NPA 0% (शून्य टक्के) राखला आहे.ही बाब बँकेच्या आर्थिक शिस्तीचे दर्शन घडवते.

**सभासद आणि ग्राहकांचे आभार**

बँकेचे सभासद संख्या २११५१ असून,या यशाचे श्रेय बँकेचे अध्यक्ष मा.इंजि.अजय अर्जुनराव पाटील, उपाध्यक्ष आणि संचालक मंडळाने सर्व सभासद,कर्जदार, ठेवीदार,ग्राहक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले आहे. सर्वांच्या सहकार्यामुळेच बँक ही उंची गाठू शकली,अशा भावना व्यक्त करत बँकेने सर्वांचे आभार मानले आहेत. अत्याधुनिक युगात ग्राहकांनी डिजिटल व्यवहारांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहनही यावेळी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## कौठा येथील हनुमान मंदीरात असलेल्या अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता



**दैनिक वादळ वार्ता**

बिलोली तालुक्यातील कौठा येथील रामजन्मोत्वापासून अखंड शिवनाम सप्ताहाची सुरुवात झाली होती दैनंदिन कार्यक्रम शिवपाठ रुद्राभिषेक परमहस्य पारायण गाथा भजन प्रवचन महाप्रसाद शिवपाठ शिवकिर्तन व रात्री शिवजागर असे विविध कार्यक्रम संपन्न झाले महाराष्ट्रातील नामवंत शिव कीर्तनकार प्रवचनकार टाळकरी माळकरी साधू संत महंत गायक वादक यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती शिव पाटाने सर्व भक्तिमय वातावरण होते ३१ मार्च रोजी श्री गुरु १०८ सोमलिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर यांची शोभायात्रा काढण्यात आली टाळ मृदंगाच्या निनादात व जयघोषाने कौठा नगरी शिवनामाने दुमदुमली होती जन्मोत्सव सोहळ्याच्या दिवशी युवा किर्तनकार शि भ प बालाजी स्वामी महाराज पारडीकर यांच्या प्रसादावरील कीर्तनाने सांगता झाली कार्यक्रमाचं सुबद्ध नियोजन समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आलं होतं.

## केज तालुक्यात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस



**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यात सायंकाळी ५:०० वाजता विजेच्या कडकडासह अवकाळी पाऊस झाला.

दि. १ एप्रिल, बुधवार रोजी दुपारी ५:०० केज तालुक्यात पाऊस झाला. वारा आणि विजेच्या कडकडाटासह पाऊस झाला. या अवकाळी अवकाळी पाऊस आणि वाऱ्याने आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले असून छोट्या कैऱ्या खाली पडून नुकसान झाले आहे. तसेच फळभाज्या आणि पालेभाज्या या पिकांना अवकाळी पाऊस व वाऱ्याने मोठा फटका बसल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पिके गेल्याने पुन्हा शेतकरी संकटात सापडला आहे.


## पनवेल–अलिबाग एसटी सेवा ठप्प रात्री प्रवाशांची गैरसोय वाढली

**दैनिक वादळ वार्ता**
**अलिबाग । प्रतिनिधी**

पनवेलहून अलिबाग, रेवदंडा, मुरुड आणि वडखळ या भागात जाणाऱ्या प्रवाशांना रात्री ८ ते ८.३० नंतर एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या वेळेनंतर नियमित बस सेवा थांबत असल्याने प्रवाशांना इतर अनियमित गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. मुंबईहून कामानिमित्त येणाऱ्या चाकरमान्यांना रात्री उशिरा आल्यानंतर राहण्यासाठी लॉज शोधावी लागते किंवा एसटी स्थानकातच रात्र काढावी लागते. या समस्येमुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी सांगितले की, स्थानिक लोकप्रतिनिधी एसटीने प्रवास करत नसल्याने त्यांना नागरिकांच्या अडचणींची जाणीवच होत नाही.

**वडखळ प्रवाशांचे हाल; वाहतूक सुविधांची कमतरता**

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे केंद्र असलेल्या वडखळ गावातही एसटी सेवेकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. रात्री ९ नंतर पनवेलहून वडखळकडे जाण्यासाठी अलिबाग मार्गाव्यतिरिक्त इतर बस थांबत नसल्याची तक्रार प्रवासी राजेश म्हात्रे यांनी केली आहे.



प्रवाशांनी विनंती करूनही अनेकदा कंडक्टर नकार देतात, तसेच काही बस स्थानकात थांबतच नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधींविषयी वाढती नाराजी**

या प्रश्नावर खासदार, आमदार किंवा जिल्हा परिषद सदस्यांकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत आहे. निवडून दिलेल्या प्रतिनिधींना जाब विचारावा, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. देवव्रत पाटील यांनी वडखळ, अलिबाग, रेवदंडा आणि मुरुडसाठी अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करण्याची मागणी केली आहे.

**डेपो व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह**

पनवेल व अलिबाग एसटी डेपोच्या कामकाजावरही संशय व्यक्त केला जात आहे. खासगी वाहनचालक प्रवाशांकडून जादा भाडे (सुमारे ३०० रुपये) आकारून त्यांची लूट करत असल्याच्या तक्रारी आहेत. काही नागरिकांनी एसटी अधिकाऱ्यांसोबत संगनमत असल्याचाही आरोप केला आहे.

तसेच, डेपोमधील संपर्क क्रमांक कायम व्यस्त किंवा बंद असतात आणि अधिकाऱ्यांचे वर्तन उद्धट असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत.

**प्रवाशांच्या अपेक्षा वाढल्या; तातडीच्या उपाययोजनांची गरज**

शासनाकडून चांगल्या सेवांची अपेक्षा असताना प्रत्यक्षात एसटी सेवा कोलमडलेली दिसत आहे. चालक व कंडक्टरांची कमतरता, जुन्या बस आणि विस्कळीत वेळापत्रक यामुळे प्रवासी त्रस्त आहेत. रात्रीच्या अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करणे, वडखळ येथे बस थांबे वाढवणे आणि डेपोमधील गैरप्रकारांची चौकशी करणे, या मागण्या आता जोर धरत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077